## पाहिजेत

**ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत**

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

## शैक्षणिक

**शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश**

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा

मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २८६ वा | शुक्रवार, दि. २६ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




**दक्षिणोत्तर भारताच्या लहान मोठ्या पेठाशी सचोटीने व्यापार करणारी व मराठवाड्याच्या प्रवेशद्वाराशी विनटलेली शेतकरी व व्यापारी यांची एकमेव विश्वासपात्र पेठ म्हणजेच कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे पंडीत जवाहरलाल नेहरु प्रिन्सिपल मार्केट यार्ड बार्शी**

**बाजार समितीची वैशिष्टे :**

१) सर्व सोयीनीयुक्त प्रशस्त धान्य २) शेतमालाची उघड लिलाव पध्दतीने विक्री व त्वरीत चुकारा ३) ६० मे. टन क्षमतेचा भुईकाटा ४) जनावर बाजार ५) फळे भाजीपाला मार्केट ६) कडबा मार्केट ७) शॉपिंग सेंटर ८) कोल्ड स्टोअरेज ९) मालाचे योग्य वजन होण्यासाठी परवानाधारक तोलार १०) सुलभ शौचालय ११) जनावरासाठी निवारा शेड १२) ई-नाम योजना १३) शेतमाल तारण योजना १४) हमीभाव खरेदी केंद्र १५) गाडूळ खत प्रकल्प १६) धान्य चाळणी यंत्र व गोदाम १७) सौर ऊर्जा प्रकल्प १८) शेतकरी निवास १९) विविध औषधी वनस्पतीची लागवड व संवर्धन २०) संपूर्ण बाजार आवारामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे.

**✻ शुभेच्छुक: कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी, ता. बार्शी.,जि.सोलापूर** फोन :- ०२१८४-२२२९७६

## संपादकीय

# चालण्याचा हक्क

भारतीय संविधानाने नागरिकांना अनेक मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. या हक्कांमध्ये सन्मानाने जगण्याचा, मुक्तपणे संचार करण्याचा आणि सुरक्षित वातावरणात जीवन जगण्याचा अधिकार अंतर्भूत आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयात "चालण्याचा हक्क" हा देखील नागरिकांचा मूलभूत हक्क असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. हा निर्णय केवळ कायदेशीर दृष्टिकोनातून महत्त्वाचा नसून देशातील शहरी विकास, वाहतूक व्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत नवी दिशा देणारा ठरू शकतो.

या प्रकरणाची सुरुवात एका अत्यंत दुर्दैवी घटनेतून झाली. शाळेत जाणाऱ्या अवघ्या पाच वर्षांच्या मुलाचा ट्रकच्या धडकेत मृत्यू झाला. चौकशीदरम्यान असे निदर्शनास आले की, ज्या ठिकाणी हा अपघात झाला तेथील पदपथ चालण्यायोग्य नव्हते. परिणामी त्या लहान मुलाला रस्त्यावरून चालावे लागले आणि त्याचा जीव गेला. ही घटना केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून देशभरातील लाखो पादचाऱ्यांच्या असुरक्षित वास्तवाचे प्रतीक आहे. या घटनेची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने सरकारांना पादचाऱ्यांसाठी सुरक्षित, सुयोग्य आणि अडथळामुक्त पदपथ उभारण्याचे निर्देश दिले आहेत.

भारतात चालण्याची परंपरा केवळ दैनंदिन जीवनापुरती मर्यादित नाही. सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिवर्तनांमध्ये चालण्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. महात्मा गांधींची दांडी यात्रा, स्वातंत्र्यलढ्यातील विविध मोर्चे, शेतकरी आंदोलनांपासून ते सामाजिक न्यायासाठी निघालेल्या पदयात्रांपर्यंत चालणे हे लोकशाही अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम राहिले आहे. त्यामुळे चालण्याचा अधिकार हा केवळ वाहतुकीचा प्रश्न नसून तो लोकशाही मूल्यांशी निगडित आहे, हे न्यायालयाने अधोरेखित केले आहे.

परंतु आज देशातील बहुसंख्य शहरांचे वास्तव याच्या अगदी उलट दिसते. अनेक शहरांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून पदपथ उभारले जातात; मात्र काही दिवसांतच त्यांच्यावर अतिक्रमणांचा विळखा पडतो. फेरीवाले, अनधिकृत दुकाने, जाहिरात फलक, पार्क केलेली वाहने आणि विविध प्रकारचे अडथळे यामुळे पदपथांचा मूळ उद्देशच हरवून जातो. परिणामी पादचाऱ्यांना वाहनांच्या गदीर्तून रस्त्यावर चालण्याचा धोका पत्करावा लागतो.

वाहतुकीची वाढती गर्दी ही आणखी एक गंभीर समस्या आहे. शहरांमध्ये झेब्रा क्रॉसिंगची व्यवस्था असली तरी वाहनचालकांकडून त्याचा आदर केला जात नाही. सिग्नलवर झेब्रा क्रॉसिंगवर वाहने उभी करणे ही सामान्य बाब झाली आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि दिव्यांग व्यक्तींना रस्ता ओलांडणे हे धोकादायक आव्हान ठरते. सुरक्षित पादचारी संस्कृती निर्माण करण्यात प्रशासन आणि समाज दोघेही कमी पडत असल्याचे चित्र दिसते.

पदपथांवरील अतिक्रमणाचा प्रश्न विशेषतः गंभीर आहे. बहुतेक महानगरपालिका आणि नगरपालिकांनी हॉकर झोन निश्चित केलेले असले तरी प्रत्यक्षात अनेक विक्रेते ग्राहकांची गर्दी असलेल्या मुख्य रस्त्यांवरील पदपथांवरच व्यवसाय करतात. त्यामुळे पादचाऱ्यांसाठी राखीव असलेली जागा व्यापारी वापरासाठी वापरली जाते. या परिस्थितीकडे अनेकदा स्थानिक प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचे आरोप होतात. यामागे राजकीय, आर्थिक आणि प्रशासकीय हितसंबंधांचे गुंतागुंतीचे जाळे असल्याचेही बोलले जाते.

सर्वोच्च न्यायालयाने मात्र अत्यंत स्पष्ट भूमिका घेतली आहे. ज्या ठिकाणी पदपथ बांधले गेले आहेत तेथे त्यांचा प्रथम आणि प्रमुख वापर पादचाऱ्यांसाठीच झाला पाहिजे. पादचारी हा रस्ते व्यवस्थेतील सर्वात दुर्बल घटक असल्याने त्याच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. वाहनांसाठी रस्ते असतात, तर पदपथ हे पादचाऱ्यांसाठी असतात. या साध्या तत्त्वाचे पालन करणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे.

भारतीय संविधानाच्या कलम १९ अंतर्गत नागरिकांना देशात मुक्तपणे फिरण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तसेच कलम २१ अंतर्गत जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार संरक्षित करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याच घटनात्मक तरतुदींचा व्यापक अर्थ लावत चालण्याच्या अधिकारालाही मूलभूत हक्काचे स्वरूप दिले आहे. हा निर्णय भविष्यातील शहरी नियोजनासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

तथापि, प्रत्येक हक्कासोबत कर्तव्यही येते. पादचाऱ्यांना सुरक्षित पदपथ मिळणे जितके आवश्यक आहे, तितकेच वाहतूक नियमांचे पालन करणेही आवश्यक आहे. अनेकदा रेल्वे स्थानकांवर पूल उपलब्ध असतानाही काही लोक जीव धोक्यात घालून रूळ ओलांडतात. रस्ता ओलांडताना निर्धारित जागेचा वापर न करणे, मोबाईलमध्ये गुंतून चालणे किंवा वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करणे यामुळेही अपघात घडतात. त्यामुळे नागरिकांमध्ये जागरूकता आणि शिस्त निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ कायद्याचा आदेश नसून मानवी जीवनाच्या मूल्याची जाणीव करून देणारा संदेश आहे. विकासाचा अर्थ केवळ उड्डाणपूल, महामार्ग आणि वेगवान वाहतूक एवढाच नसतो; तर सामान्य नागरिकाला सुरक्षितपणे चालता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे हाही विकासाचाच महत्त्वाचा भाग आहे. सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, वाहतूक यंत्रणा आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यासच चालण्याचा हा मूलभूत हक्क प्रत्यक्षात उतरू शकेल.

आज गरज आहे ती पदपथांना त्यांच्या मूळ उद्देशासाठी मुक्त करण्याची, पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची आणि शहरांना माणूसकेंद्री बनविण्याची. सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयाचे खरे यश तेव्हाच मानले जाईल, जेव्हा देशातील प्रत्येक नागरिक निर्भयपणे, सुरक्षितपणे आणि सन्मानाने आपल्या रस्त्यांवर चालू शकेल.

# राजर्षी शाहू महाराज : सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते

26 जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म झाला. शाहू महाराजांनी त्यांच्या संपूर्ण जीवन कार्यात लोककल्याणाचे व समाज उद्धाराचे कार्य केले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना लोककल्याणकारी राजा असे संबोधले जाते. महाराष्ट्र शासनामार्फत त्यांचा जन्मदिन हा संपूर्ण राज्यात सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे शाहू महाराजांना सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते म्हटले जाते.

छत्रपती शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म 26 जून 1874 रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई ह्या दांपत्याच्या पोटी झाला. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले (17 मार्च 1884).

छत्रपती शाहू महाराजांवर महात्मा फुले व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव होता. छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार होते. सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला आवश्यकता आहे असे सांगून त्यांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणासाठी सवलती जाहीर केल्या. महाराष्ट्राने छत्रपती शाहू महाराजांचा शेतकऱ्यांचा खरा राजा म्हणून गौरव केला. भारतातील वस्तीगृहाचे आद्य जनक म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा गौरव केला जातो. ते कल्याणकारी राजा होते. एप्रिल 1919 भारतात बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य करणाऱ्या अखिल भारतवर्षीय क्षत्रिय महासभा या संस्थेच्या कानपुर येथे भरलेल्या 13 व्या अधिवेशनात शाहू महाराजांना त्यांच्या कार्याबद्दल राजर्षी ही पदवी बहाल करण्यात आली.

ग्रामीण भागातून शहरी भागात शिकण्यास येणाऱ्या विविध जाती-धर्माच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जातीची वस्तीगृह स्थापन शाहू महाराजांनी केली. तर सन 1901 मध्ये मराठा विद्यार्थ्यांसाठी विक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना कोल्हापूर येथे केली. तर नाशिक येथे उदोजी विद्यार्थी वस्तीगृह उभारून शहरी भागात विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केल्याने त्या गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले.



सन 1902 मध्ये शाहू महाराजांनी राज्यातील मागासवर्गीयांसाठी प्रशासकीय सेवा मध्ये 50 टक्के जागा राखीव ठेवल्या. तसेच महाराजांनी 15 नोव्हेंबर 1906 किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सन 1907 मध्ये मिस क्लार्क बोर्डिंग हाऊस ची स्थापना अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी करून त्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. सन 1911 मध्ये कोल्हापूर संस्थानात जाहीरनामा काढून त्यानुसार 15 टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा करून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली केली.

शाहू महाराजांनी 1911 मध्ये शिक्षक प्रशिक्षण व शिक्षकांसाठी मेरीट प्रमोशन योजना राबवले. तर 1917 मध्ये आदेश काढून माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. व कोल्हापूर संस्थानातील गोरगरीब घरातील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. 14 फेब्रुवारी 1919 पाटील शाळा व त्याला जोडून तलाठी वर्ग सुरू करण्याचा जाहीरनामा काढला.

बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून शाहूंनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षणावर या संस्थानात होणारा खर्च मोठा होता.

लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल सुरू केले व पुणे येथे श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल तर जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट ची स्थापना करून शाहू महाराजांनी तांत्रिक शिक्षणाला महत्त्व देण्याबरोबरच लष्करी शिक्षणाची दारे खुली केली.

शाहू महाराजांनी सन 1917 मध्ये विधवा विवाहाचा कायदा करून पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली तर 1918 मध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला. व समाजातील अनिष्ठ चाली-रीती वर हल्ला चढवला. 1918 मध्ये महार वतने रद्द करून जमिनी रयतवारी ने करून दिल्या व वेठबिगारी प्रथा कायद्याने बंद केली व 1920 मध्ये माणगाव अस्पृश्यतानिवारण परिषदेचे आयोजन केले.

छत्रपती शाहू महाराज यांनी व्यवसाय निर्बंध दूर करून अस्पृश्यांना व्यवसाय स्वातंत्र्य दिले. जातिभेदास तीव्र विरोध केला महाराजांच्या या सर्व लोक कल्याणकारी कार्यामुळे खरेखुरे लोककल्याणकारी राजा होते. पददलित व मागासवर्गीयांची उन्नती हेच छत्रपती शाहू महाराजांनी जीवितकार्य मानले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी घोषणा त्यांनी केली. उदार विचारप्रणालीचा राजा होते. राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर पण मागासलेल्या प्रजेच्या सेवेचे व्रत सोडणार नाही, असे शाहू महाराजांनी ठासून सांगितले. कामगारांनो संघटित व्हा व आपले हक्क प्राप्त करून घ्या असा संदेश त्यांनी दिला.

He was a king. But democratic king. असे गौरवउद्गार भाई माधवराव बागल यांनी शाहू महाराजांबद्दल काढले. तर थोर समाज सुधारक विठ्ठल रामजी शिंदे शाहू महाराजा बद्दल म्हणाले की, शाहू राजा नुसता मराठा नव्हता ब्रह्मतोतर ही नव्हता. तो नव्या युगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा स्वाभाविक तरंग होता.

– **सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी,
सोलापूर.

# नेताजी प्रशालेत पालक शिक्षक सभा उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत पालक शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार होते. व्यासपीठावर मावळते पालक-शिक्षक संघाचे सहसचिव वैशाली अभंगे, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, ज्येष्ठ शिक्षक संगप्पा दसगोंडे, गणपती पाटील, सिद्धाराम कुंभार आदी उपस्थित होते.



याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक काशिनाथ माळगोंडे, राजेंद्र मुलगे, शिवानंद पुजारी, विजयालक्ष्मी माळवदकर, जयश्री बिराजदार आदी शिक्षकांनी शालेय शिस्त, बदलता शैक्षणिक अभ्यासक्रम, शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा, शालेय उपक्रमांचे महत्त्व, विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि शैक्षणिक गुणवत्ता या विषयांवर मार्गदर्शन केले.

यावेळी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पालक-शिक्षक संघाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची सवार्नुमते निवड करण्यात आली. पदसिद्ध अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, उपाध्यक्षपदी साधना तावसकर, सचिवपदी गणपती पाटील आणि सहसचिवपदी प्रकाश तुम्मा आदीसह वर्ग निहाय पालक सदस्यांची निवड करण्यात आली.

पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांनी प्रास्ताविकेत विद्यार्थ्यांच्या आवश्यक कागदपत्रांची माहिती सांगून शाळेत राबविण्यात येणाऱ्या स्काऊट-गाईड उपक्रम, शालेय गणवेशाचे महत्त्व, एकल पालक योजनेचा लाभ आणि विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार व वाचनाची आवड आदी उपक्रमांची माहिती सांगितले. मुख्याध्यापक रविशंकर कुंभार म्हणाले, आज विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला महत्त्व असल्याने पालकांनी पाल्यांच्या अभ्यासाकडे वेळोवेळी लक्ष द्यावे.सध्या शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन डिजिटल पध्दतीने शिक्षक अध्यापन करित असल्याने विद्यार्थ्यांचे गुणवत्ता नक्कीच वाढणार असून पालकांनी शिक्षकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.शेवटी पालकांनी विचारलेल्या शंकांचे निरसन केले.पालकांनी शाळेतील विविध उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले तर प्रकाश कोरे यांनी आभार मानले.

# खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील वाकाव येथील रेल्वे लाईनवरील नागरिकांच्या सोयीसाठी अंडरपास (अंडरग्राऊंड मार्ग) निर्माण करण्याच्या मागणीला अखेर यश आले आहे. माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे रेल्वे प्रशासनाने या कामाला मंजुरी दिली आहे.




यासंदर्भात मध्य रेल्वे, सोलापूर विभागाचे अपर मंडल रेल प्रबंधक यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना पत्राद्वारे माहिती दिली आहे. वाकाव येथील 403/8-9 येथे पादचाऱ्यांसाठी सबवे बांधण्याचे काम ढल-16 अंतर्गत मंजूर करण्यात आले असून या कामाचा अपेक्षित पूर्णत्व कालावधी मार्च 2027 पर्यंत असल्याचे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

वाकाव परिसरातील नागरिकांना रेल्वे मार्ग ओलांडताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला.

नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी आणि सुरक्षित प्रवासासाठी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# एन. बी. नवले सिंहगडला दुहेरी मानांकनाचा बहुमान; महाविद्यालयाची गुणवत्तेची मोहोर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांनी शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून महाविद्यालयाला राष्ट्रीय आणि विद्यापीठ स्तरावर दुहेरी सन्मान प्राप्त झाला आहे.




देशातील नामांकित शैक्षणिक मूल्यांकन संस्था Careers360 ने महाविद्यालयाला 'AA+' रेटिंग प्रदान केले आहे, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या Academic and Administrative Audit (AAA) मध्ये महाविद्यालयाने 600 पैकी 550 गुणांसहीत उल्लेखनीय 91.66 टक्के गुणांसह 'A++' ग्रेड प्राप्त करून आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

देशातील अभियांत्रिकी शिक्षण संस्थांचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता, प्राध्यापकवर्ग, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधन कार्य, पायाभूत सुविधा, प्लेसमेंट, नवोपक्रम, विविधता आणि विद्यार्थी विकास या निकषांचा विचार केला जातो. या सर्व बाबींमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे Careers360 ने एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाला भारताच्या सर्वोत्तम अभियांत्रिकी संस्थांपैकी एक म्हणून मान्यता देत अअ+ रेटिंग प्रदान केले आहे.

याचबरोबर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत सोलापूर विद्यापीठाच्या Academic and Administrative Audit समितीने केलेल्या सविस्तर मूल्यमापनात महाविद्यालयाने 91.66 टक्के गुणांसह 'A++' ग्रेड मिळवली. शैक्षणिक नियोजन, प्रशासकीय कार्यक्षमता, विद्यार्थी सुविधा, संशोधन संस्कृती, गुणवत्ता हमी उपक्रम, परीक्षा व्यवस्था आणि संस्थात्मक विकास या सर्व क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे.

महाविद्यालयाने गेल्या काही वर्षांत उद्योगाभिमुख शिक्षण, अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधन व नवोपक्रमाला चालना, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील प्लेसमेंट, कौशल्य विकास कार्यक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. त्याचाच परिणाम म्हणून संस्थेला सातत्याने विविध स्तरांवर मानांकन आणि गौरव प्राप्त होत आहेत.

या दुहेरी यशाबद्दल संस्थेचे सहसचिव तथा सोलापूर कॅम्पसचे डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, सिंहगड संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सांगितले की, 'राष्ट्रीय स्तरावरील AA+ रेटिंग आणि विद्यापीठाच्या AAA ऑडिटमधील A++ ग्रेड हे संपूर्ण शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. भविष्यातही गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण, संशोधन आणि उद्योगाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून संस्थेची प्रगती अधिक उंचावण्याचा आमचा प्रयत्न राहील.'

या दुहेरी मानांकनामुळे एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले असून सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

# तृतीयपंथी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केंद्र शासनाने सुरू केली SMILE शिष्यवृत्ती योजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise (SMILE) योजनेअंतर्गत तृतीयपंथी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता 9 वीपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

पात्रता : शासनमान्य शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे तसेच UGC/AICTE मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी यासाठी पात्र राहतील.

निकषः- Transgender Certificate असणे आवश्यक आहे.

लाभाचे स्वरूपः- पूर्व-माध्यमिक (Pre-Matric) व उत्तर-माध्यमिक (Post-Matric) स्तरासाठी वार्षिक रु. 13 हजार 500 इतकी शिष्यवृत्ती तसेच अर्जदार भारतीय नागरिक असावा व इतर कोणत्याही केंद्र अथवा राज्य शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेत नसावा व विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार संलग्न असणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था व संबंधित यंत्रणांनी या योजनेची व्यापक प्रसिद्धी करून पात्र तृतीयपंथी विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करावे, असे निर्देश समाज कल्याण आयुक्तालयाने दिले आहेत. अधिक माहितीसाठी तृतीयपंथी व्यक्तींनी केंद्र शासनाच्या https://transgender.dosje.gov.in या राष्ट्रीय पोर्टलवर अर्ज करावा असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

## वात्रटिका

### टीईटी परीक्षा महत्त्व

तुम्ही चुकीचे वागत राहा
आम्ही फक्त बघत राहतो...
तुम्ही चुकीचे वाचत राहा
आम्ही फक्त ऐकत राहतो...
शोक प्रस्ताव वाचन ऐकले
आणि टीईटीचे महत्त्व पटले...
पण शिक्षकांसाठीच फक्त
टीईटी आहे हे मात्र खटकले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# सोलापूर महानगरपालिकेत IWMS प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीचा गौरव सोहळा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेतील विकासकामांचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यासाठी राबविण्यात आलेल्या इंटेलिजंट वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीम (IWMS) या आधुनिक प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दलचा गौरव सोहळा आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महापौर श्री. विनायक दादा कोंडयाल यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.



या कार्यक्रमास उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती सौ. रंजीता ताई चाकोते, सभागृह नेते श्री. नरेंद्रजी काळे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक सौ. रोहिणी ताई तळवळकर, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, नगर अभियंता सौ. सारिका अकुलवार, प्रकाश दिवाणजी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी उपस्थित होते. तसेच IWMS प्रणालीचे विकसक असलेल्या Innomise Technologies Pvt. Ltd. चे कार्यकारी संचालक श्री. रोहन अजगेकर यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाद्वारे प्रणालीची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली.

IWMS ही विकासकामांच्या संपूर्ण जीवनचक्राचे डिजिटल व्यवस्थापन करणारी एकात्मिक प्रणाली असून, कामांचे नियोजन, अंदाजपत्रक तयार करणे, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, कार्यादेश, ई-मोजणी पुस्तिका (e-Measurement Book), बिल प्रक्रिया, कामांच्या प्रगतीचे निरीक्षण तसेच विविध व्यवस्थापकीय अहवाल तयार करणे या सर्व प्रक्रिया एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून देते.

या प्रणालीमुळे सोलापूर महानगरपालिकेतील विकासकामांच्या व्यवस्थापनात अधिक गती, अचूकता आणि पारदर्शकता निर्माण झाली आहे. कागदाधारित प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घट होऊन मंजुरी प्रक्रिया अधिक सुलभ झाली असून, अधिकारी, अभियंते आणि कंत्राटदारांना आवश्यक माहिती, बिलांची स्थिती तसेच कामांचा प्रगती आढावा ऑनलाइन उपलब्ध होत आहे. यामुळे प्रशासनातील कार्यक्षमता वाढून निर्णय प्रक्रिया अधिक परिणामकारक होण्यास मदत होत आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी IWMS प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल समाधान व्यक्त करत, सोलापूर महानगरपालिकेच्या डिजिटल प्रशासनाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे नमूद केले. तसेच भविष्यातही तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिकांना अधिक दर्जेदार, पारदर्शक आणि गतिमान सेवा उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी क्हटर प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटदार तसेच Innomise Technologies Pvt. Ltd. च्या संपूर्ण टीमचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# संस्थेचा लौकिक वाढविण्यात शिक्षकांचे मोलाचे योगदान : अजिंक्यराणा पाटील



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अनगर येथील सहशिक्षक बब्रुवान बोडके हे २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार संस्थेचे अध्यक्ष तथा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या शुभहस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना अजिंक्यराणा पाटील म्हणाले, "कोणतीही संस्था तिच्यामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक काम, निष्ठा आणि समर्पणाच्या बळावर मोठी होत असते. शाळेतील शिस्त, विद्यार्थ्यांची घेतली जाणारी काळजी, शिक्षकांचा प्रामाणिकपणा आणि कष्ट यांच्या बळावर पालकांचा विश्वास संपादन करण्यात संस्थेला यश आले आहे. शिक्षकांनी केलेल्या गुणवत्तापूर्ण कायार्मुळेच या विद्यालयाने मोहोळ तालुक्यातील सर्वात मोठी व गुणवत्तापूर्ण शाळा असा लौकिक प्राप्त केला आहे. संस्थेचा नावलौकिक वाढविण्यात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे."

यावेळी कृषिभूषण दादा बोडके, श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले, प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी प्राचार्य महादेव चोपडे, मुख्याध्यापक रामचंद्र पाटील, मुख्याध्यापक संजय डोंगरे, उपमुख्याध्यापक माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके, मोहोळ तालुका क्रीडा समन्वयक संभाजी चव्हाण, युवराज गुंड, संभाजी बोडके, चंद्रकांत यावलकर, सिताराम बोराडे, अभिमन्यू शिंदे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमात सतीश सुर्वे, अस्मिता बोडके, कृषिभूषण दादा बोडके, माजी प्राचार्य रणजीत थिटे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले तसेच वर्षा बोडके यांनी मनोगते व्यक्त करताना बब्रुवान बोडके यांच्या शैक्षणिक, सामाजिक व विद्यार्थीहिताच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या शांत, संयमी व कर्तव्यदक्ष स्वभावाचा उल्लेख करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी तसेच बोडके यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. बोडके यांच्या २७ वर्षांच्या समर्पित सेवेमुळे संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लागल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यवान दाढे यांनी केले, तर उपमुख्याध्यापक माधव खरात यांनी आभार प्रदर्शन केले.

# लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील गिरझणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्रामस्थांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते डॉ.धवलसिंह मोहिते- पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.याप्रसंगी ग्रामस्थांचे वतीने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश साठे यांचे शुभहस्ते डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांचा फेटा पुष्पहार व अण्णाभाऊ साठे यांचा ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला.यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना वह्या,पेन व पेन्सिलचे वाटप प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले व त्यानंतर मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले, प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना एका वर्षात जवळपास ११०० शाळांना मंजुरी व बांधकाम करून शिक्षण क्षेत्रामध्ये खूप मोठे काम केल्याचा उल्लेख केला आणि विद्यार्थ्यांना शरीर तंदुरुस्त राखण्यासाठी व्यायाम आणि खेळांची आवड जोपासण्या बाबत मार्गदर्शन केले आणि मुलांना पुढे उच्च शिक्षण घेण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमासाठी हरिदास माने,भोजराज माने, काकासो माने, महादेव साठे, रमेश साठे, संजय माने, सागर देशमुख, दिपक पिंजारे, शंकर चव्हाण, विजय माने, रवी माने, सुनील माने, शिवाजी माने, बाळासो सोनवले, नेताजी काळकुटे, रामदास माने, गजानन माने, सचिन माने, शामराव पालकर, ज्योतीराम माने, शंकर वाघ, लक्ष्मण कुंभार, ग्रामसेवक नवले भाऊसाहेब, सरपंच सौ.गंगुबाई साठे, जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, ग्रामपंचायत कर्मचारी, पत्रकार संजय लोहकरे, कृष्णा लावंड, ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक प्रकाश कांबळे यांनी केले.

# छत्रपती शिवाजी प्रशालेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर येथील मराठा समाज सेवा मंडळ सोलापूर संचलित, छत्रपती शिवाजी प्रशालेत 21जून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती.सुजाता जुगदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री.महेश माने यांनी भूषविले. प्राध्यापक व योगशिक्षक श्री.शिवराज पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले.

प्रारंभी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी कु. संजीवनी पाटील हिने श्लोक सादर केले. प्रशालेतील योग शिक्षिका सौ.नेहा स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनी कु. काया काळे आणि त्या टीम मधील सदस्य कु.श्रावणी पाटील,कु.नंदिनी बंडगर, कु.जेनिफर बंद्दीपुडे,कु.कीर्ती कोले,कु.स्वरा कारंडे, कु.सृष्टी कारंडे, कु.रेणुका चव्हाण, कु.अक्षता गंगोंडा, कु.रितिका कोळी, कु.सृष्टी हडपद कु.प्रज्ञा जमादार,कु.अक्षरा गदडे, कु.प्रज्ञा जमादार, कु.पवित्रा नागलगाव, कु.कमळाबाई पडसलगी, कु.प्रीती खांडेकर, चि.भाग्योदय नागलगाव, चि.सदाशिव बिराजदार यांनी योगा थीमवर योगासनाचे अतिशय सुंदर असे प्रात्यक्षिक सादर केले. सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी योगासनाचे विविध प्रकाराचे सादरीकरण केले.

प्रमुख पाहुणे प्राध्यापक शिवराज पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शारीरिक कष्टाची सवय लावणे खूप महत्त्वाचे आहे. त्यांनी गोष्टी रुपातून विद्यार्थ्यांना योगासनाचे महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात संस्थेचे जनरल सेक्रेटरी महेश माने म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यानी सदृढ शरीरासाठी नियमित योगासने करणे आवश्यक आहे. योगामुळे आपण शारीरिक दृष्ट्या व मानसिक दृष्ट्या सक्षम होतो.

या कार्यक्रमास संस्थेचे जनरल सेक्रेटरी महेश माने, शालेय समिती चेअरमन( प्राथ.विभाग)विनायक राव पाटील, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, उपमुख्याध्यापक श्रीपादराव जगदाळे,पर्यवेक्षक सुरेश जगताप व किरण देशमुख, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रियांका पवार, प्रसिद्धीप्रमुख निलेश गळवे, योगशिक्षिका नेहा स्वामी तसेच शिक्षक-शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी व पालक, विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका कु.लक्ष्मी गायकवाड यांनी केले तर आभार प्राध्यापिका सुनंदा बिराजदार यांनी मानले.

# १३७८ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेबाबत विभागीय क्रमांक ५ व ६ च्या लोकप्रतिनिधींसोबत महापौरांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर बैठक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरासाठी प्रस्तावित १३७८ कोटी रुपयांच्या सर्वसमावेशक पाणीपुरवठा योजनेच्या अनुषंगाने आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय क्रमांक ५ व ६ मधील लोकप्रतिनिधींसोबत सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत विभागीय क्रमांक ५ व ६ मधील प्रभागांमध्ये राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी या विभागांमध्ये टाकण्यात येणाऱ्या मुख्य जलवाहिन्या (पाईपलाईन), वितरण जलवाहिन्यांचे जाळे, नवीन जलकुंभ (पाण्याच्या टाक्या) उभारण्यासाठी आवश्यक जागांची उपलब्धता, महापालिकेच्या मालकीच्या जागांची स्थिती तसेच प्रस्तावित टाक्यांच्या ठिकाणांची माहिती सादर करण्यात आली.

तसेच ज्या ठिकाणी नवीन पाण्याच्या टाक्या व एमबीआर (Master Balancing Reservoir) उभारण्यात येणार आहेत, त्या ठिकाणी महानगरपालिकेची, शासनाची अथवा खाजगी जागा उपलब्ध आहे का याची सविस्तर माहिती संकलित करण्यात यावी, अशा सूचना महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. प्रस्तावित प्रकल्पासाठी आवश्यक जागांची उपलब्धता, भूसंपादनाची आवश्यकता तसेच भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी नियोजनपूर्वक कार्यवाही करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

बैठकीत संबंधित प्रभागांतील जुन्या व जीर्ण झालेल्या पाण्याच्या टाक्यांची माहिती, त्यांचे पुनर्बांधणी अथवा बदल, नव्याने उभारण्यात येणाऱ्या टाक्यांची संख्या, क्षमता, लाभक्षेत्र तसेच कोणत्या भागांमध्ये नवीन पाईपलाईन टाकण्यात येणार आहेत व जुन्या जलवाहिन्या बदलण्यात येणार आहेत याची सविस्तर माहिती लोकप्रतिनिधींना देण्यात आली.

महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांनी उपस्थित लोकप्रतिनिधींच्या सूचना व शिफारशी जाणून घेतल्या. शहरातील कोणताही भाग पाणीपुरवठा योजनेपासून वंचित राहू नये, सर्व नागरिकांना समान व नियमित पाणीपुरवठा मिळावा, पाण्याचा अपव्यय टाळण्यात यावा तसेच प्रकल्पाची निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी वेळेत पूर्ण करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता ताई चाकोते, सभागृह नेते नरेंद्रजी काळे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, नगरसेविका वृषाली चालुक्य, नगरसेवक अहजर हुंडेकरी, नगरसेविका वनिता पाटील, नगरसेविका सुमन चाबुकस्वर नगरसेविका अनिशा मोगल, नगरसेविका वैशाली भोपळे, नगरसेविका वृषाली चालुक्या, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी प्रकाश सांवत, उमर बागवान तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर विभागीय कार्यालय ६ मधील येणाऱ्या प्रभागांमधील आढावा बैठक घेण्यात आला यावेळी. नगरचे नगरसेवक किसन जाधव नगरसेवक सत्यजित गायकवाड नगरसेवक, नगरसेवक राजशेखर पाटील नगरसेवक ऋषिकेश म्हेत्रे, नगरसेविका चैत्राली गायकवाड, नगरसेविका सोनाली गायकवाड, शिवराज गायकवाड, अर्जुन गायकवाड, महादेव गवळी यावेळी प्रभागांमध्ये प्रस्तावित असलेल्या टाक्या तसेच नवीन बांधण्यात येणाऱ्या टाक्या तसेच पाईपलाईन व इतर पाणीपुरवठा संदर्भात चर्चा करण्यात आली

बैठकीत १३७८ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीसंदभार्तील विविध तांत्रिक बाबी, जागा उपलब्धता, जलसाठा क्षमता, वितरण व्यवस्था आणि पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या योजनेमुळे सोलापूर शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा होऊन नागरिकांना दीर्घकालीन, शाश्वत व दर्जेदार पाणीपुरवठा उपलब्ध होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## मोहोळ नगरपरिषद,मोहोळ

ता- मोहोळ, जि-सोलापूर-४१३२१३

Gmail-comcmohol@gmail.com | दूरध्वनी क्र. ०२१८९ - २३२०५०

जा.क्र.मोनप/न.रचना/२०२६/३०३ | दिनांक- २५/०६/२०२६

### जाहीर प्रसिद्धीकरण

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : जमीन- २०२६/प्र.क्र.२०/जमीन- १ दि. २५ मार्च २०२६ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदीनुसार शासकीय जमिनीवरील दिनांक ०१/०१/२०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेले केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमण नियमित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

मोहोळ शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की शासकीय जमिनीवरील अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी खालील प्रमाणे कागदपत्रे नगरपरिषदेस सादर करणे आवश्यक आहे.

**लाभार्थ्यांनी सादर करावयाची कागदपत्रे :-**

**१. दिनांक १ जानेवारी २०११ पूर्वीचा पुरावा- मतदार यादी, विज बिल, नप मालमत्ता कर पावती**

**२. १ वर्षाच्या आतील सक्षम प्राधिकरणाचा रहिवासी दाखला**

**३. सक्षम प्राधिकरणाचे जात प्रमाणपत्र**

**४. सक्षम प्राधिकरणाचे भूमिहीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र**

**५. शासन निर्णयाप्रमाणे नगरपरिषदेने निश्चित केलेले स्वयंघोषणापत्र**

**६. कुटुंबातील सर्वांचे आधार कार्ड**

मोहोळ नगरपरिषदेमार्फत आवाहन करणेत येते की, अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी वरील नमूद आवश्यक त्या कागदपत्रासह तात्काळ प्रधानमंत्री आवास योजना शहर स्तरीय तांत्रिक कक्ष मोहोळ नगरपरिषद यांचेकडे संपर्क साधून ३१ डिसेंबर २०२६ पूर्वी अर्ज दाखल करावा. सदर दिनांकापर्यंत अर्ज प्राप्त झालेल्या पात्र व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण प्राप्त असेल. तथापि, या दिनांकापर्यंत अर्ज न करणाऱ्या व्यक्ती तसेच इतर अपात्र व्यक्ती/संस्था यांची अतिक्रमणे, त्यानंतर कोणत्याही दिनांकास निष्कासित करण्यासाठी पात्र राहतील. अशी अतिक्रमणे धडक कार्यक्रम घेऊन व कालमर्यादा निश्चित करुन निष्कासित करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. योगेश डोके)**
**मुख्याधिकारी,मोहोळ नगरपरिषद, मोहोळ**


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 286

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 7 | | | 3 | 8 | 2 |
| | 8 | | | | | | 7 | |
| | 3 | | | 8 | | 9 | | |
| | | 4 | | | 8 | 5 | 2 | |
| | | | 2 | 7 | | | | |
| | 7 | 2 | 9 | 4 | | | 6 | |
| 9 | 2 | 6 | 5 | 1 | | | 3 | |
| 1 | | 8 | 3 | 6 | | | 4 | |
| 3 | | | 8 | 2 | 9 | 6 | | 1 |

# सोलापुरात खासदार संजय दिना पाटील यांच्या निषेधार्थ पत्रकारांची निदर्शने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पत्रकारांना धमकीची भाषा वापरल्याचा आरोप करत सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने सोलापुरातील पत्रकारांनी खासदार संजय दिना पाटील यांच्या विरोधात निषेध आंदोलन केले. संबंधित प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.



अलीकडेच शिवसेना (ठाकरे गट) सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केलेले खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांनी प्रश्न विचारल्यानंतर अरेरावीची भाषा वापरत धमकी दिल्याचा आरोप पत्रकार संघटनांनी केला आहे. या वक्तव्याच्या निषेधार्थ पत्रकारांनी एकत्र येत सोलापुरात आंदोलन केले.

निदर्शनादरम्यान पत्रकारांनी जोरदार घोषणाबाजी करत राज्य शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि पत्रकारांना सुरक्षित वातावरणात काम करण्याची हमी द्यावी, अशी मागणी केली. स्वतंत्र आणि निर्भीड पत्रकारितेचे संरक्षण करणे ही लोकशाहीची गरज असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकार पत्रकारांबाबत संवेदनशील आहे. मात्र पत्रकारांना धमकावणे म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रयत्न आहे. लोकप्रतिनिधींनी जबाबदारीने व संयमाने वागणे अपेक्षित असताना अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे चुकीचा संदेश जात असल्याची प्रतिक्रिया देत श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी या घटनेचा निषेध नोंदविला.

यावेळी लोकशाहीत पत्रकारांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपणे महत्त्वाचे आहे. प्रश्न विचारणे त्यांचा अधिकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ या घटनेची नोंद घेऊन संबंधितांवर कडक कारवाई करावी. अशा प्रकारच्या घटनांमुळे पत्रकारांवर दबाव निर्माण होण्याची शक्यता असून शासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक आहे, अशी मागणी श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे, राज्य पत्रकार अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके यांनी केली.

या आंदोलनात श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आदेप्पा, डिजिटल मीडिया असोसिएशनचे अध्यक्ष विजयकुमार बाबर, डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे सोलापूर अध्यक्ष विकास कस्तुरे, कृष्णकांत चव्हाण, प्रीतम पंडित, अनिकेत गायकवाड, सौरभ वाघमारे, रवी ढोबळे, विनोद हुमनाबादकर, विक्रांत कालेकर, अनिल कांबळे, इरण्णा जुजगार, इरफान शेख, दीपक शिराळकर, लक्ष्मीकांत शिंदे, तौसीफ शेख, यासीन शेख यांच्यासह विविध पत्रकार संघटनेचे पत्रकार, कॅमेरामन व माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आषाढी यात्रेतील भाविकांच्या सुविधांसाठी सर्व कामांना सर्वसाधारण सभेची मंजुरी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत आषाढी यात्रा कालावधीत ग्रामपंचायतींना साडेचार कोटी रुपए निधी देणेस मान्यता देणेत आली. ग्रामपंचायतींच्या अनुदानात १ कोटी रूपयांची वाढ करणेत आली आहे.



वारकरी यांना देणेत येणारे विविध कामांना मंजुरी आजच्या सर्वसाधारण सभेत देणेत आली.

जिल्हा परिषदेची विशेष सर्वसाधारण सभा आज पंढरपूर येथे विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात घेणेत आली. या सभेचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य हे होते. या सभेस उपाध्यक्ष इंद्रजित पवार, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते, कृषी व संवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला बाल कल्याण समितीचे सभापती अमृता वाघे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुयंकांत भुजबळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपुरवाड, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, माध्यमिक शिक्षणाधिकाकी सचिन जगताप प्रमुख उपस्थित होते.

या सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शना खाली पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ग्रामविकास विभाग अंतर्गत भरगोस निधी वारकरी यांचे साठी दिले बद्दल अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार , पक्ष नेत्या रश्मी बागल , जि प सदस्य पृथ्वीराज माने, व्यंकटेश भालके, अतुल पवार, अजिनाथ देशमुख यांनी अभिनंदन करून आभार मानले.

**ग्रामपंचातींना वाढीव अनुदानाची मागणी**

पालखी मार्गावरील सांगोला, माढा व बार्शी, मंगळवेढा व उत्तर व दक्षिण सोलापूर तालुक्यातून येणारे मार्गावरील ग्रामपंचायतींना वाढीव अनुदान देणेची मागणी केली. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी १ कोटी रूपयांची वाढ करणेत आले असल्याचे सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले. या पुर्वी ८१ ग्रामपंचायतींना 3 कोटी 50 लोन रुपए अनुदान देणेत येत होते. या मध्ये १ कोटी रुपए वाढ करणेत आली आहे. आणखी १० ग्रामपंचायतींचा पालखी मार्गावरील ग्रामपंचायती मध्ये समावेश करणेत आला आहे. ग्रामपंचायत विभागाच्या अंतर्गत वारकरी स्वागत कमान व वारकरी यांना पायांना आराम फुटमसाजर च्या कामांना मंजुरी देणेत आली. मुख्यमंत्री वारकरी निवारा केंद्र (जर्मन हँगर), वारकरी यांच्या साठी शौचालय सुविधा व पालखी मार्गावरील स्वच्छता, स्नानगृह, पालखी तळांवर जोडणारे रस्ते, पिण्याचे पाण्याचे टँकर सुविधा, वारकरी यांचे साठी औषधे खरेदी, मोबाईल चार्जिंग स्टेशन या कामांनी एकमताने मंजुरी देणेत आली.

असल्याचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी सांगितले. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने पिण्याचे टँकर ची निविदा सर्वात प्रथम पुर्ण केले बद्दल सिईओ कुशल जैन यांनी अभिनंदन केले.

कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर व त्यांचे टीमने वेळेत निविदा पुर्ण केली आहे.

**आमदार राजेंद्र राऊत यांचा अभिनंदनाचा ठराव..!**

विधान परिषदेचे आमदार म्हणून राजेंद्र राऊत यांचे निवडी बद्दल जि प सदस्य पृथ्वीराज माने यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. जि प अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार व सदस्यांनी एकमताने अभिनंदन केले.

**सिईओ कुशल जैन यांची तात्पुरता..!**

वारकरी यांचे सुविधांसाठी पुणे, सातारा, सोलापूर यांचे सह तिन्ही जिल्ह्यातील विकास कामांसाठी निविदा प्रक्रिया व सुक्षंम नियोजन करून कामांना गती दिल्या बद्दल जि प सदस्य पृथ्वीराज माने यांनी अभिनंदन केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी सर्व नियोजना साठी बारकाईने लक्ष दिले आहे. पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल जाधव, अधिक्षक तांबोळी, यांनी सर्वसाधारण सभेसाठीचे व्यवस्थेचे नियोजन केले.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता (MAHA TET) परीक्षा केंद्र परिसरात मनाई आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र लोकसेवा आयोग, यांचेमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टअलअ ळएल) परीक्षा - 2026 ही दि. 28 जून 2026 रोजी सकाळी 10 वा. ते 17 वा. या वेळेत सोलापूर शहरातील खाली नमुद 47 परीक्षा उपकेंद्रांवर होणार आहे.

सदर परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्राच्या परिसरात झेरॉक्स सेंटर, फॅक्स, ईमेल, रेडिओ, इंटरनेट अशा दळणवळण सुविधा यांचा परीक्षेच्या अनुषंगाने गैरवापर होण्याची शक्यता आहे, अशा सुविधा कार्यरत ठेवणे, वायरलेस सेट, ट्रांझिटर, मोबाईल फोन, टॅबलेट, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, संगणक गणनायंत्र (कॅल्क्युलेटर), ई-मेल, इंटरनेट, झेरॉक्स सेंटर यासारख्या दळणवळण साधनांचा परीक्षा केंद्राच्या आवारात उपयोग केला जातो. तसेच परीक्षा प्रक्रियेशी संबंधीत नसलेली व्यक्तीं परीक्षा केंद्राच्या आवारात प्रवेश करणे. तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात बाह्य उपद्रव कमी करणे, परीक्षार्थीना कोणताही अडथळा होऊ नये आणि परीक्षा प्रक्रियेशी संबधित शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांचे परीक्षेशी संबंधित कर्तव्ये चोखपणे, कोणताही अडथळा अथवा उपद्रव न होता बजावता यावे म्हणून परीक्षा केंद्राच्या सभोवताली 100 मीटर परीसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 चा आदेश लागू करणे निकडीचे असल्याने पोलीस उप आयुक्त, (गुन्हे/विशा), डॉ. अश्विनी पाटील यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 अन्वये आदेश दिला की, दिनांक 28 जून 2026 रोजी सकाळी 07.30 वा. ते दुपारी 18.00 वा. पर्यंत पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दीचे कार्यक्षेत्रातील खाली नमुद सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा केंद्रापासून 100 मीटर परिसरात खालील कृती करण्यास बंदी घालत आहे.

- परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे.
- परीक्षा केंद्राच्या परिसरात सार्वजनिक शांततेसं बाधा निर्माण होईल असे कृत्य करणे.
- परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरातील झेरॉक्स, फॅक्स सेंटर, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे अशा दळणवळण सुविधा आणि पानपट्टी कार्यरत ठेवणे.
- परीक्षा केंद्राचे परिसरात मोबाईल फोन, टॅबलेट, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, सेल्युलर फोन, वायरलेस सेट, ट्रान्झीटर व इतर माध्यमासह प्रवेश करणे.
- परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात कोणत्याही वाहनांस प्रवेश करणे.
- परीक्षा प्रक्रियेशी संबंधित नसलेली व्यक्ती (उमेदवारांचे नातेवाईकासह) परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात प्रवेश करणे.
- परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येणे इत्यादी.

सदरचा आदेश परीक्षा प्रक्रियेशी संबंधित सर्व शासकीय अधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी रुंद परीक्षार्थी पोलीस अधिकारी पोलीस अंमलदार यांना त्यांचे परीक्षेसंबंधी कर्तव्य पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाही हा आदेश दिनांक 28 जून 2026 रोजी सकाळी 07.30 ते सायंकाळी 18.00 वाजेपर्यंत खालील परीक्षा केंद्रांच्या 100 मीटर परिसरात लागू राहील या आदेशाचा कोणी कोणत्याही प्रकारे भंग केल्यास ती व्यक्ती भारतीय न्यायसंहिता विषय 23 चे कलम 223 प्रमाणे शिक्षेस पात्र राहील असे आदेश पोलीस उपयुक्त डॉ. अश्विनी पाटील सोलापूर शहर यांनी दिले आहेत.

**परीक्षा केंद्रांची यादी पुढीलप्रमाणे आहेत**

**फौजदार चावडी परिसरात येणाऱ्या शाळांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.**

सिंहगड पब्लिक स्कूल, केगाव सोलापूर युनिव्हर्सिटी सोलापूर. ज. रा. चंडक प्रशाला, ज्युनिअर कॉलेज बाळे, सोलापूर. श्री. दिगंबर जैन गुरुकुल हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज बाळीवेस, सोलापूर. श्री. सिद्धेश्वर बॉईज हायस्कूल, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर. सुरजाबाई रामलाल गर्ल हायस्कूल सेवासदन मोरारजी पेठ सरस्वती चौक सोलापूर. संभाजीराव शिंदे प्रशाला मुरारजी पेठ, सोलापूर. श्री. सिद्धेश्वर गर्ल्स हायस्कूल सिद्धेश्वर पेठ, सोलापूर. छत्रपती शिवाजी प्रशाला, 101 ब मोरारजी पेठ, सोलापूर. शरदचंद्र पवार प्रशाला, जुना पुना नाका, मोरारजी पेठ, सोलापूर. रावजी सखाराम हायस्कूल, बुधवार पेठ सम्राट चौक, सोलापूर. राज मेमोरियल इंग्लिश मीडियम स्कूल जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर. एस. आर. चंडक इंग्लिश हायस्कूल बुधवार पेठ, सोलापूर. सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला, गणपती घाट दत्त चौक, सोलापूर. MIT विश्वशांती गुरुकुल स्कूल होंडा शोरूम च्या पाठीमागे, सोलापूर.

**जेलरोड पोलीस ठाणे परिसरात केंद्रांची नावे पुढीलप्रमाणे आहेत**

एस. एस. ए. उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर. स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूल अशोक चौक, सोलापूर. वालचंद कॉलेज ऑफ आर्ट अँड सायन्स, अशोक चौक, सोलापूर. कुचन हायस्कूल 272, रविवार पेठ, सोलापूर. सोलापूर सोशल असोसिएशन आर्ट अँड कॉमर्स कॉलेज सिद्धेश्वर पेठ, सोलापूर. बेगम कमरुनिसा कारीगर गर्ल्स हायस्कूल सिद्धेश्वर पेठ, सोलापूर. एम. ए. पानगल हायस्कूल 141 सिद्धेश्वर पेठ, सोलापूर. सौ. बी. म. कन्या प्रशाला साखर पेठ, सोलापूर. संगमेश्वर पब्लिक स्कूल सात रस्ता, सोलापूर. हरिभाई देवकरण प्रशाला व मैदान समोर, सोलापूर.

**सदर बाजार पोलीस ठाणे परिसरातील परीक्षा केंद्राचे नावे पुढीलप्रमाणे आहेत.**

संगमेश्वर महाविद्यालय 165 रेल्वे लाईन, सोलापूर. एस. टी. जोसेफ हायस्कूल 45 रेल्वे लाईन, सोलापूर. द प्रोग्रेशिव एज्युकेशन सोसायटी उर्दू हायस्कूल साउथ सदर बाजार, सोलापूर. मॉडर्न हायस्कूल गांधीनगर, सोलापूर. चंद्रभागाबाई येलगुरवार प्रशाला सिविल लाईन विकास नगर, सोलापूर. आदर्श कन्या विद्यालय रेल्वे लाईन मोदी, सोलापूर. श्री. वसंतराव नाईक हायस्कूल नॉर्थ सदर बाजार, सोलापूर. बटरफ्लाय इंग्लिश मीडियम स्कूल, उजनी कॉलनी कुमठा नाका, सोलापूर.

**एमआयडीसी पोलीस ठाणे परिसरातील परीक्षा केंद्राची नावे पुढीलप्रमाणे आहेत**

एस. व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी अक्कलकोट रोड, सोलापूर. नेताजी सुभाष चंद्र बोस हायस्कूल, नीलम श्रमजीवी नगर, आकाशवाणी केंद्र रोड, एमआयडीसी, सोलापूर. व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मीडियम. वज्रेश्वरी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर. श्री. दत्त प्रशाला चौपाड श्रीशैल नगर, एमआयडीसी अक्कलकोट रोड, सोलापूर. श्री. न. फु. शहा - कोठारी प्रशाला शिवगंगा नगर - 5, सोलापूर.

**जोडभावी पेठ परिसरातील केंद्रांची नावे**

एस. व्ही. सी. एस. हायस्कूल भवानी पेठ, सोलापूर. अण्णाप्पा काडादी हायस्कूल भवानी पेठ, सोलापूर. श्री. सिद्धेश्वर बालमंदिर इंग्लिश मीडियम स्कूल 910, भवानी पेठ, सोलापूर. उमाबाई श्राविका हायस्कूल 197, बुधवार पेठ, सोलापूर.

**विजापूर नाका परिसरातील केंद्रांची नावे पुढीलप्रमाणे आहेत**

पोद्दार इंटरनॅशनल हायस्कूल, राजस्व नगर, विजापूर रोड, सोलापूर. जागृती विद्यामंदिर नेहरूनगर विजापूर रोड, सोलापूर. भारतीय विद्यापीठ माध्यमिक विद्यालय विजापूर रोड, जुळे सोलापूर. विलास चंद्र मोतीचंद्र मेहता हायस्कूल विशाल नगर, जुळे सोलापूर. युनिक इंग्लिश मीडियम स्कूल कॉलेज ऑफ फार्मसी कॅम्पस, सोलापूर.

# तांदुळवाडी दुर्घटना : मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाखांची आर्थिक मदत वितरित

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे १४ जून २०२६ रोजी पिकअप वाहन विहिरीत कोसळून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या ८ जणांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मदतीनुसार मुख्यमंत्री सहायता निधी कक्षामार्फत एकूण ४० लाख रुपयांची मदत सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून संबंधित वारसांना वितरित करण्यात आली.

माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे पंढरपूर-सातारा मार्गावर पिकअप वाहन विहिरीत कोसळून अपघात झाला होता. या अपघातात इंदुबाई दशरथ बावचे (वय ६५), पूजा अमोल सातुरे (वय २३), पूजाव बालाजी बावचे (वय २७), अश्विनी संदीप बावचे (वय २७), संस्कार संदीप बावचे (वय १४), संस्कृती संदीप बावचे (वय १४), भारव अमोल सातुरे (वय ८) आणि समर्थ बालाजी बावचे (वय ६ महिने) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेनुसार जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी आर्थिक मदतीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर मुख्यमंत्री सहायता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपये, अशी एकूण ४० लाख रुपयांची आर्थिक मदत सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वितरित करण्यात आली.

